# शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित

| | |
|---|---|
| बाब क्रमांक | 8 |
| संचालक मंडळ बैठक क्रमांक | 592 |
| बैठकीचा दिनांक | २६.५.२०१६ |
| पुरस्कते विभाग प्रमुख | मुख्य भूमी व भूमापन अधिकारी |

C.S. DEPTT. CIDCO

**अ) विषय** :- नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित जमिनीच्या निवाडयामध्ये कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्ड असा उल्लेख असलेल्या कुळांना साडेबारा टक्के योजने अंतर्गत भूखंड वाटप करणेबाबत....

**ब) विचारार्थ बाब** :- उपरोक्त विषयी धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.

**क) मान्यतेचा प्रकार** :- प्रशासकीय मंजूरी

**ड) प्रस्तावाचा तपशील** :-

नवी मुंबई हे नवीन शहर विकसित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम,१९६६" मधील तरतूदीनुसार ठाणे, पनवेल व उरण या तीन तालुक्यातील एकूण ९५ गावांतील (गावठाणाचा व नगर पालिकेचा भाग वगळून) सर्व जमिनी सन १९७० मध्ये स्थलनिर्देशित केलेल्या आहेत. यापैकी बहूतांश जमिनीच्या भूसंपादनाची कार्यवाही भूसंपादन अधिनियम,१८९४ अन्वये पूर्ण करण्यात आलेली असून, उर्वरीत जमिनीची भूसंपादनाची प्रक्रिया सुरु आहे.

संपादित जमिनीचे प्रकल्पग्रस्त खातेदारांना दिलासा देण्याच्या दृष्टीने शासनाने नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीपोटी साडेबारा टक्के जमीन, प्रकल्पग्रस्तांना मंजूर करण्याचा निर्णय शासनाने क्र.एलक्यूएन १९८५/१७१०/सीआर २१७/८५/नवि १० दि.६.३.१९९० व क्र.सिआयडी १०९४/२०९४/प्र.क्र.२८७/नवि १० दि.२८.१०.१९९४ घेतला असून त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणा प्रमाणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.

शासन निर्णय नगर विकास विभाग दि.६.३.१९९० मधील तरतूद "ज" नुसार स्वत:ची जमीन स्वत: न कसणारे शेत जमीन मालक (Absentee Landlord) मिठागराचे मालक, सार्वजनिक विश्वस्त संस्था आणि इतर संस्था यांना या जमिन वाटप योजनेचा फायदा मिळणार नाही असे नमूद करण्यात आलेले आहे. तसेच याविषयी अधिक स्पष्टीकरण मिळणेबाबत शासनाकडे केलेल्या संदर्भात शासनाने दि.१५.१२.१९९७ रोजी कळविलेले आहे, त्यानुसार संपादित जमिन जर लागवडीयोग्य असेल, परंतु जमीन मालकांच्या ताब्यात व वहिवाटीत नसून कुळांच्या वहिवाटीखाली असेल व कुळेच या जमिनीमध्ये लागवड करत असतील तर अशा संवर्गातील स्वत:ची जमीन स्वत: न कसणारे जमीन मालक यांना साडेबारा टक्के योजनेचा फायदा देता येणार नाही. अशा जमिनींची प्रत्यक्ष वहिती करणा-या कुळांना भूसंपादन निवाडयामध्ये त्यांचा उल्लेख असल्यास निवाडयातील नुकसान भरपाईची ६०% रक्कम दिली असल्यास कुळांनी जमिनीचा ताबा दिला आहे याची खात्री करुन साडेबारा टक्के योजनेतून भूखंड वाटपाचा लाभ हा पूर्णत: कुळांनाच देण्यात येतो.

नवी मुंबई प्रकल्पासाठी पनवेल तालुक्यातील कोपर, उलवे व इतर गावातील संपादित करण्यात आलेल्या जमिनींपैकी काही जमिनी भूसंपादनाच्यावेळी कोर्ट ऑफ वॉर्ड अॅक्ट अन्वये मा.जिल्हाधिकारी, कुलाबा यांच्या देखरेखीखाली होत्या व यापैकी काही जमिनींमध्ये कुळांकडून वहिती करण्यात येत होती.

सदर जमिनींच्या संपादनापोटी काही खातेदारांना अद्यापही साडेबारा टक्के योजनेतून भूखंडाचे वाटप प्रलंबित असल्यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये तीव्र असंतोष असून ते विमानतळाचे काम वारंवार बंद पाडीत आहेत. त्यामुळे नियोजित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ क्षेत्रातील कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डशी संबंधित जमिनींच्या संपादनापोटी साडेबारा टक्के योजनेतून भूखंड वाटपाबाबत धोरणात्मक निर्णय घेणे अत्यंत आवश्यक आहे. सदर प्रकरणाची पूर्वपिठीका खालील प्रमाणे असून एक विशेष बाब म्हणून निर्णय घेण्यासाठी संचालक मंडळाकडे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे -

अशा सर्व प्रकरणामध्ये कुळांना साडेबारा टक्के योजनेचा लाभ देण्यात यावा यासाठी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प कृती समिती/लोकप्रतिनिधी व भूधारकांकडून वारंवार मागणी होत होती. सदर मागणीच्या अनुषंगाने तत्कालिन व्यवस्थापकीय संचालक यांचे अध्यक्षतेखाली दि.२२.१.२०११ रोजी बैठकसुध्दा घेण्यात आली होती. तेव्हा असे निदर्शनास आले की, यापैकी काही प्रकरणामध्ये मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम,१९४८ च्या कलम ३२ ग अन्वये कुळांना मालक घोषित केले असून सदरचे आदेश कोणत्याही वरिष्ठ प्राधिकरणाने रद्द केलेले नाहीत.

तर मौजे कोपर येथील १२ प्रकरणांमध्ये अपर तहसिलदार,शेत जमीन न्यायाधिकरण,पनवेल यांनी कुळ कायदा कलम ३२ ग अनुसार कुळांना मालक ठरविण्याचे आदेश दिले होते. सदर आदेशांची पुर्नतपासणी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी,रायगड यांनी दिले होते. त्या अनुषंगाने तत्कालिन रजा राखीव उप जिल्हाधिकारी यांनी प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व कुळ कायद्यातील संबंधित कलमातील तरतूदींचा विचार करुन त्यांचे आदेशामध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे --

पक्षकार कुळांनी माहे सप्टेंबर,१९८६ मध्ये केलेल्या अर्जावरुन अपर तहसिलदार,पनवेल यांनी, कुळ कायदा कलम ३२ ग अन्वये चौकशी सुरु करुन आदेश केले आहेत. सुनावणीच्या दिवशी दि.२९.६.१९८६ रोजी कुळांचे छापील नमुन्यात जबाब घेतले असून ते तपशीलवार नाहीत. आदेशात जमीन मालक यांचा जबाब घेतल्याचे नमूद केले आहे. प्रत्यक्षात त्याप्रमाणे जबाब प्रकरणात समाविष्ट नाही. कुळाने त्यांचे जबाबात दि.१.४.१९५७ पूर्वी पासून जमीन कशीत असल्याचे, तसेच १.४.१९५७ पर्यंतच्या जमिनीचा खंड जमीन मालकास भरल्याचे, व जमिनीचा दस्त भरल्याचे नमूद केले आहे. तथापि त्या अनुषंगाने अपर तहसिलदार यांनी चौकशीचे वेळी त्या विधानांच्या पुष्ठर्थ आवश्यक तो कागदोपत्री पुरावा उपलब्ध करुन घेतलेला नाही. गा.नं.७/१२ च्या १९८५/८६ ची स्थिती दर्शविणारे उता-यावरुन विसंबून दि.१.४.१९५७ ला संबंधित जमिनी कुळांकडे कुळवहिवाटीस होत्या असे गृहीत धरुन, कलम ३२ ग नुसार जमिनीच्या किंमती ठरविल्या आहेत, हे संबंधित तरतूदीच्या विसंगत आहे. भूसंपादन अधिकारी यांनी दाव्यातील जमिनीबाबत भूसंपादनाची कार्यवाही सुरु करुन त्याप्रमाणे अॅवार्डस करुन कुळ व जमीन मालक यांना द्यावयाच्या नुकसान भरपाई रक्कमेची ६०% व ४०% अशी विभागणी करुन पेमेंट सुरु केले या वस्तुस्थितीचा विचार अपर तहसिलदार यांनी न करता कुळाच्या नांवे जमिन विक्रीचे आदेश काढले आहेत ते चुकीचे आहे. तसेच मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियमातील कलम ८८ क ची तरतूद विचारात घेतलेली नाही. संबंधित तरतूदीनुसार विविक्षित जमिनीस या अधिनियमाच्या पूर्ववर्ती उपबंधांतील तरतूदी



Patil

लागू होत नाहीत व त्या बाबतीत माफीची तरतूद आहे. कलम ८८ (१) (क) मध्ये पाल्याधिकरणाच्या व्यवस्थेखाली असलेल्या जमिनीचा समावेश आहे. चौकशीचे वेळी दाव्यातील जमिनी पाल्याधिकरणाचे व्यवस्थेखाली होत्या. अशी स्थितीत त्या जमिनीस कलम ३२ ग ची तरतूद लागू होत नाही. अपर तहसिलदार यांनी या महत्वाच्या तरतूदीचा विचार केलेला नाही. त्यामुळे अपर तहसिलदार यांनी दिलेले उपरोक्त सर्व आदेश रद्द ठरविणे क्रमप्राप्त आहे.

कलेक्टर कोर्ट ऑफ वार्डसची संबंधित मौजे कोपर येथील सदर १२ प्रकरणांबाबत जिल्हाधिकारी,रायगड यांनी दि.२९.८.२०११ चे पत्रान्वये खालील प्रमाणे खुलासा केला आहे -

१) अपर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण,पनवेल यांनी वरील १२ प्रकरणात दिलेल्या आदेशांची मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम,१९४८ चे कलम ७६ - अ नुसार फेरतपासणी करण्याबाबत जिल्हाधिकारी,रायगड यांचेकडील पत्र क्र.आरबी/डब्ल्यू/आरबी/अ/१०/८७ दि.२४.३.१९८७ अन्वये रजा राखीव उप जिल्हाधिकारी,रायगड अलिबाग यांना कळविण्यात आले. त्यानुसार तत्कालिन रजा राखीव उप जिल्हाधिकारी यांनी अपर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण,पनवेल यांचे दि.२९.९.१९८६ रोजीचे सर्व आदेश रद्द केले आहेत. सदर आदेशांना गाव अधिकार अभिलेखात अद्याप अंमल दिल्याचे उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येत नाही.

२) प्रस्तुत जमिनी मिळकती हया भूसंपादन कायदा,१८९४ अन्वये संपादित होऊन गाव नं.७/१२ च्या कब्जेदार सदरी या कार्यालयाचे आदेश क्र.GB/LQ/Metro/१ B/८-२/८६, निरंक ११.१०.१९८८ अनुसार 'शासनातर्फे सिडको' अशी नोंद फेरफार क्र.९०२ दि.२४.७.१९८९ अन्वये घेण्यात आलेली आहे. याबाबतचा सविस्तर तपशील प्रपत्र - ब मध्ये दर्शविला आहे. या सर्व प्रकरणात भूसंपादन निवाडयाची रक्कम कुळ व मालकांनी सन १९८६, १९८८ व १९८९ मध्ये स्विकारल्याचे दिसून येते.

३) वरील बाबींचे अवलोकन केले असता मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम,१९४८ चे कलम ७६ अ प्रमाणे रजा राखीव उप जिल्हाधिकारी यांनी दि.२२.८.१९८८ रोजी पारित केलेल्या आदेशाचे उक्त अधिनियमाचे कलम ७६ प्रमाणे महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांना पुर्नविलोकनाचे अधिकार आहेत. तथापि सदर प्रकरणी २५ वर्षाचा कालावधी होऊन गेलेला आहे.

मौजे कोपर,ता.पनवेल येथील वर नमूद केलेल्या जमिनीचे भूसंपादन करण्यात आलेले आहे. वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेता भूसंपादन कायदा,१९८४ मधील तरतूदीप्रमाणे भूसंपादन अंतिम निवाडयामध्ये कोणताही फेरबदल करता येणार नाही. त्यामुळे भूसंपादन निवाडा प्रमाण मानून सिडकोमार्फत पुढील नियमाधीन कार्यवाही होणे आवश्यक आहे.

यानंतर कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डशी संबंधित प्रकरणांबाबत दि.१.१२.२०११ रोजी तत्कालिन व्यवस्थापकीय संचालक यांनी खालील अटींची पुर्तता करणा-या प्रकरणामध्ये वाटप करण्यास तत्वत: मान्यता दिलेली असून प्रकरणनिहाय तपासणी करुन सादर करणेबाबत आदेश दिले होते --

१) संपादनाच्या निवाडयामध्ये मालक/कब्जेदार रकान्यामध्ये कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्ड,कुलाबा असा उल्लेख असून वहिवाटदार म्हणून कुळांची नांवे नमूद करण्यात आली आहेत.



Patil

२) भूसंपादनाच्या निवाडयामध्ये मावेजाची रक्कम ४०% मालकांना व ६०% कुळांना वितरीत करण्यात आली आहे.

३) संपादित जमिनीचे ताबे कुळांनी शासनास दिले आहेत.

४) कुळांनी अपर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण,पनवेल यांनी मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम,१९४८ चे कलम ३२ (ग) नुसार निश्चित केलेली जमिनीची खरेदी किंमत शासनास जमा केली आहे.

५) अपर तहसिलदार,पनवेल यांच्या कुळांच्या जमिन खरेदी किंमत निश्चितीचे आदेशाविरुध्द जमीन मालकांनी कोणत्याही सक्षम न्यायालयात अपिल दाखल करुन आदेश रद्द करुन घेतलेले नाहीत.

६) जमिन मालक यांनी भूसंपादनाचा संपूर्ण १०० टक्के मावेजा मिळणेबाबत कुठेही मागणी केलेली नसल्याने त्यांनी कुळाचे हक्क आणि ताबा मान्य केल्याचे दिसून येते.

७) जमीन मालकांनी संपादित जमिनीच्या मोबदल्यात कुळांऐवजी त्यांनाच साडेबारा टक्के जमीन योजने अंतर्गत जमिन मिळण्याकरीता सिडकोस केव्हाही अर्ज केलेला नाही.

८) महसूल अधिकार अभिलेखामध्ये कुळांच्या नावाच्या नोंदी मंजूर करण्यात आलेल्या असून त्या रद्द करण्यात आलेल्या नाहीत.

तसेच दि.७.१२.२०११ च्या पत्रान्वये मौजे कोपर येथील ज्या प्रकरणात मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम,१९४८ चे कलम ३२ ग चे आदेश रद्द केले आहेत त्या प्रकरणामध्ये साडेबारा टक्के योजने अंतर्गत भूखंड वाटप करणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. सदर पत्रामध्ये या सर्व १२ प्रकरणांत कुळांना साडेबारा टक्के योजने अंतर्गत भूखंड देय असलेबाबत महामंडळाची धारणा असलेचे नमूद आहे. यानंतर वेळोवेळी शासनाने विचारलेल्या पुरवणी मुद्यांबाबत (दि.२.१.२०१४, १५.५.२०१४, २९.९.२०१४, ७.१०.२०१४, २३.६.२०१५, ६.८.२०१५, ३१.८.२०१५) माहिती देण्यात आली. दि.६.८.२०१५ च्या पत्रान्वये खालील प्रमाणे शासनास कळविण्यात आले होते --

दि.३०.११.२०११ चे टिप्पणीन्वये तत्कालिन व्यवस्थापकीय संचालक यांनी कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डच्या ज्या प्रकरणांमध्ये खालील बाबींची पुर्तता होते त्या प्रकरणांमध्ये प्रकरणनिहाय तपासून वाटप करण्यास मान्यता दिलेली आहे.

१) भूसंपादनाच्या निवाडयामध्ये मालक/कब्जेदार रकान्यामध्ये कलेक्टर कोर्ट ऑफ कुलाबा असा उल्लेख असून वहिवाटदार म्हणून कुळांचे नांव नमूद करण्यात आलेले आहे.
२) भूसंपादनाच्या निवाडयामध्ये मावेजाची रक्कम ४०% मालकांना व ६०% कुळांना वितरीत करण्यात आलेली आहे.
३) संपादित जमिनीचे ताबे कुळांनी शासनाला दिलेले आहेत. तसेच मुंबई कुळ वहिवाट व शेत जमीन अधिनियम,१९४८ चे कलम ३२ (ग) नुसार निश्चित केलेली जमीनीची खरेदी किंमत शासनास जमा केलेली आहे.
४) अप्पर तहसिलदार,पनवेल यांच्या कुळांच्या जमिन खरेदी किंमत निश्चितीच्या आदेशाविरुध्द जमीन मालकांनी कोणत्याही सक्षम न्यायालयात अपील दाखल करुन आदेश रद्द करुन घेतलेले नाहीत.



Patil

यास अनुसरुन याच गावातील ६ प्रकरणांमध्ये वाटप करण्यात आलेले आहे. तथापि शासनाकडे संदर्भ केलेल्या अप्पर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण,पनवेल यांचे ३२ ग चे आदेश रजा राखीव उप जिल्हाधिकारी यांनी रद्द केले असल्याने वरील अट क्र.४ ची पुर्तता होत नसल्याने शासनाकडे संदर्भ करण्यात आलेला होता.

त्यास अनुसरुन शासनाने दि.१२ ऑक्टोंबर,२०१५ चे पत्रान्वये शासनास पुढील प्रमाणे कळविले आहे -

"भूसंपादन अधिनियम,१८९४ मधील तरतूदीनुसार केलेल्या अंतिम निवाडयानुसार कोर्ट ऑफ वॉर्ड व्यवस्थापनाखाली जमिनीबाबत कुळांना साडेबारा टक्के जमीन योजनेचा लाभ देताना निश्चित करण्यात आलेल्या अट क्र.१ ते ४ सिडकोच्या स्तरावर अंतिम करण्यात आल्या आहेत. त्यास शासनाची यापूर्वी मान्यता घेण्यात आलेली नाही. त्यामुळे सिडकोने निश्चित केलेल्या अटीमध्ये शिथिलता देणे ही सर्वस्वी सिडकोच्या अधिकारातील बाब असल्यामुळे याप्रकरणी अट (४) शिथील करुन साडेबारा टक्के योजनेचा लाभ देणेच्या अनुषंगाने गुणवत्तेनुसार आपण आपल्या स्तरावर निर्णय घेण्यात यावा."

कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डशी संबंधित प्रकरणे ही प्रामुख्याने मौजे कोपर व उलवे येथील असून दोन्ही गांवे ही विमानतळ बाधित गांवे आहेत. या गावातील प्रकल्पग्रस्त प्रामुख्याने कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड बाबत निर्णय होऊन भूखंड वाटप करण्याबाबत मोठया प्रमाणात मागणी होत आहे. याबाबत निर्णय अद्याप प्रलंबित असल्यामुळे या गावातील ग्रामस्थ विमातनळ प्रकल्पाच्या विरोधास विरोध करुन वारंवार काम बंद पाडत आहेत. त्यामुळे याबाबत तात्काळ निर्णय होणे आवश्यक आहे.

कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डशी संबंधीत प्रकरणांचा अभ्यास केला असता खालील ४ प्रवर्गात वर्गीकरण करता येईल.

१. **७/१२ उता-यात इतर हक्कात कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डचा बोजा :-**
अशा प्रकरणी निवाडा होण्यापूर्वी अशा जमिनी कलेक्टरच्या देखरेखीखाली होत्या व त्यामध्ये कुळ जमीन कसत होते. तथापि, सदर जमिनीमध्ये निवाडा घोषित करण्यापूर्वी व मुंबई कुळ वहिवाट शेत जमिन अधिनियम,१९४८ चे कलम ३२ ग अन्वये कुळांना मालक म्हणून घोषित करण्यात आले व कुळांकडून देय होणा-या खरेदी किंमतीच्या बोजाच्या रक्कमेबाबत ७/१२ उता-यावर इतर हक्कात नोंद करण्यात आलेली आहे. परंतु अशा प्रकरणांमध्ये निवाडा घोषित होताना पूर्णत: कुळांचे नांवे निवाडा जाहीर होऊन संपूर्ण नुकसान भरपाईची रक्कम कुळांना देण्यात आली आहे. अशा प्रकरणात निवाडा प्रमाण मानून अंतिम घोषित निवाडा हा मुंबई कुळ वहिवाट शेतजमिन अधिनियम, १९४८ अन्वये मालक झालेल्या कुळांच्या नांवे जाहीर झाला असल्याने व नुकसान भरपाईची संपूर्ण रक्कम कुळांनाच देण्यात आली असल्याने निवाडा प्रमाण मानून साडेबारा टक्के योजने अंतर्गत सदर योजनेचा लाभ कुळांनाच देय ठरतो. अशा प्रकरणी १५ भूखंडाचे वाटपही करण्यात आले आहे **(जोडपत्र - १)**.

२. **निवाडयामध्ये कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्ड आणि कुळ उल्लेख, नुकसान भरपाई कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्ड ४०% व कुळ ६०% या प्रमाणात वाटप, ३२ ग चे आदेश रद्द झाले नाहीत :-**
अशा प्रकरणांमध्ये जमिन कलेक्टरच्या देखरेखीखाली होती. सदर जमिनीत कुळे कसत होती. सदर जमिनीचा निवाडा कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्ड व कुळ यांचे नांवे घोषित झाला असून



Patil

नुकसान भरपाई कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्ड ४०% व कुळ ६०% या प्रमाणात दिलेली आहे. यापैकी काही प्रकरणांमध्ये ३२ ग चे आदेशही झालेले आहेत. परंतु या प्रकरणांमध्ये आदेश झालेल्या प्राधिकाऱ्याने ३२ ग चे आदेश रद्द केलेले नाहीत. २७ प्रकरणांमध्ये भूखंडाचे वाटप व करारनामा करुन दिलेला आहे. ३ प्रकरणांमध्ये वाटपपत्र देण्यात आले असून उर्वरीत २० प्रकरणे आदेशासाठी प्रलंबित आहेत. जिल्हाधिकारी यांनी दि.२९.८.२०११ चे पत्रान्वये सदर प्रकरणांबाबत भूसंपादन निवाडा प्रमाण मानून पुढील नियमाधीन कार्यवाही होणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. त्याचा तपशिल **जोडपत्र - २** येथे आहे.

३. **निवाडा कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्ड व कुळ यांचे नांवे आणि नुकसान भरपाई कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्ड ४०% व कुळ ६०% या प्रमाणात वाटप व ३२ ग चे आदेश रद्द करण्यात आले आहे :-**

मौजे कोपर येथील काही प्रकरणांमध्ये असे दिसून येते की, जमिन कलेक्टरच्या देखरेखीखाली होती. सदर जमिन कुळ कसत होते.

मुंबई कुळ वहिवाट शेत जमीन अधिनियम, १९४८ कलम ३२ ग अन्वये ३२ ग चे आदेश झाले आहेत. १२ प्रकरणांमध्ये कुळ मालक म्हणून घोषित केले आहे. तथापि, सदर १२ प्रकरणांमध्ये शेत जमीन न्यायाधिकरणाचे आदेश उप जिल्हाधिकारी यांनी रद्द केल्याचे दिसून येतात. (**जोडपत्र ३**).

या १२ प्रकरणांपैकी ५ प्रकरणांत महामंडळामार्फत कुळांनाच भूखंडाचे वाटप करुन करारनामा करण्यात आला आहे. ३ प्रकरणांमध्ये वाटपपत्र दिले मात्र करारनामा करण्यात आला नाही. तर उर्वरीत प्रकरणांमध्ये अद्याप वाटप करण्यात आले नसल्याचे दिसते.

४. **निवाडा कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डचे नांवे घोषित, संपूर्ण नुकसान भरपाई रक्कम कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डचे नांवे :-**

सदर जमिन कलेक्टरच्या देखरेखीखाली होती. सदर जमिनीस कोणत्याही प्रकारचे कुळ लागले नव्हते. निवाडा कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्ड यांचे नांवे घोषित होऊन संपूर्ण नुकसान भरपाई रक्कम कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्ड यांचे नांवे देण्यात आली आहे. शासन निर्णय दि.६.३.१९९० मध्ये **'ज'** नुसार स्वत:ची जमीन स्वत: न कसणारे शेत जमीन मालक (ॲबसेंटी लँडलॉर्ड) या प्रवर्गात येत असून अशा प्रकरणांमध्ये साडेबारा टक्के योजने अंतर्गत कोणत्याही प्रकारचा लाभ देय ठरत नाही (**जोडपत्र - ४**).

प्रपत्र १ ते ४ चे अवलोकन केले असता, मौजे कोपर व उलवे या विमानतळ प्रकल्पबाधित गावामध्ये सदरची प्रकरणे असल्याचे दिसून येते. या गावातील प्रकल्पग्रस्त समिती, ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी यांनी कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डच्या प्रकरणाबाबत निर्णय झाल्याशिवाय विमानतळ प्रकल्पाचे काम होऊ न देण्याबाबत वेळोवेळी भूमिका घेतली असून याबाबत अनेक निवेदने सादर केली आहेत. तसेच विमानतळ प्रकल्पातील अडीअडचणींबाबत झालेल्या विविध बैठकांमध्ये हा मुद्दा उपस्थित केला जातो. व या विषयामुळे विमानतळ प्रकल्पास बाधा येत आहे. सदरची बाब लक्षात घेऊन याबाबत तातडीने निर्णय होणे आवश्यक असल्याने विमानतळ प्रकल्पबाधित गावातील कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डशी संबंधित जमिनीबाबत एक विशेष बाब म्हणून प्रवर्गनिहाय खालील प्रमाणे निर्णय प्रस्तावित आहे -



Patil

**प्रवर्ग १ :-** निवाडा प्रमाण मानून साडेबारा टक्के योजने अंतर्गत प्रकरण निहाय आवश्यक असणा-या सर्व बाबींची तपासणी करुन वाटप होण्यास हरकत नसावी.

**प्रवर्ग २** :- या प्रवर्गातील काही प्रकरणांमध्ये यापूर्वीच झालेले वाटप लक्षात घेता तसेच प्रकल्पग्रस्तांची वरील भूमिका व विमानतळ प्रकल्पास गती देण्याच्या दृष्टीने तत्कालिन व्यवस्थापकीय संचालक यांनी तत्वत: दिलेल्या मान्यतेनुसार अटींची पुर्तता करणाऱ्या प्रकरणात वाटप करण्यास हरकत नसावी.

**प्रवर्ग ३** :- या प्रवर्गातील काही प्रकरणांमध्ये यापूर्वीच झालेले वाटप लक्षात घेता तसेच प्रकल्पग्रस्तांची वरील भूमिका व विमानतळ प्रकल्पास गती देण्याच्या दृष्टीने संचालक मंडळाने उर्वरीत प्रकरणांबाबत निर्णय घेणे उचित होईल.

**प्रवर्ग ४ :-** स्वत:ची जमीन स्वत: न कसणारे शेत जमीन मालक (ॲबसेंटी लँडलॉर्ड) या प्रवर्गात येत असून अशा प्रकरणांमध्ये साडेबारा टक्के योजने अंतर्गत कोणत्याही प्रकारचा लाभ देय ठरत नाही.

वरील जोडपत्रामध्ये समाविष्ट प्रकरणा व्यतिरिक्त विमानतळ क्षेत्रातील कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डशी संबंधित अन्य प्रकरणे निदर्शनास आल्यास संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून देऊन वरील प्रवर्गनिहाय पुढील कार्यवाही करणे उचित होईल.

अ) अपेक्षीत वित्तीय भार :- निरंक

ब) न्यायालयीन आवश्यकता/अपेक्षीत/तरतूद :-

क) उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक यांचेकडून कार्यसूची टिप्पणी प्राप्त झालेल्या मंजूरीची तारीख :- __________

ड) **मसुदा ठराव :-**

कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डशी संबंधित प्रकरणांत धोरणात्मक निर्णया अभावी नियोजित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पास विलंब होत असल्यामुळे संचालक मंडळ विशेष बाब म्हणून खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | प्रवर्ग | तपशील | निर्णय |
|---|---|---|---|
| १ | प्रवर्ग १ | ७/१२ उता-यात इतर हक्कात कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डचा बोजा | निवाडा प्रमाण मानून साडेबारा टक्के योजने अंतर्गत प्रकरण निहाय आवश्यक असणा-या सर्व बाबींची तपासणी करुन वाटप होण्यास हरकत नसावी. |
| २ | प्रवर्ग २ | निवाडयामध्ये कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्ड आणि कुळ उल्लेख, नुकसान भरपाई कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्ड ४०% व कुळ ६०% या प्रमाणात | तत्कालिन व्यवस्थापकीय संचालक यांनी तत्वत: दिलेल्या मान्यतेनुसार अटींची पुर्तता करणाऱ्या प्रकरणात वाटप करण्यास हरकत नसावी. |



Patil

| | | | |
|---|---|---|---|
| | | वाटप, ३२ ग चे आदेश रद्द झाले नाहीत. | |
| ३ | प्रवर्ग ३ | निवाडा कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्ड व कुळ यांचे नांवे आणि नुकसान भरपाई कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्ड ४०% व कुळ ६०% या प्रमाणात वाटप व ३२ ग चे आदेश उपजिल्हाधिकारी यांनी रद्द केले आहेत. | --- |
| ४ | प्रवर्ग ४ | निवाडा कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डचे नांवे घोषित ,संपूर्ण नुकसान भरपाई रक्कम कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डचे नांवे | स्वत:ची जमीन स्वत :न कसणारे शेत जमीन मालक) ॲबसेंटी लँडलॉर्ड (या प्रवर्गात येत असून अशा प्रकरणांमध्ये साडेबारा टक्के योजने अंतर्गत कोणत्याही प्रकारचा लाभ देय ठरत नाही. |

-----------

प्रस्तुतकर्ता :- 20/5/16

नांव : (विजयसिंह पाटील)

कर्मचारी क्रमांक : ३४१९९

पदनाम : मुख्य भूमी व भूमापन अधिकारी

**Item No. 8/592 BM :** नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित जमिनीच्या निवाडयामध्ये कलेक्टर कोर्ट ऑफ वॉड असा उल्लेख असलेल्या कुळांना साडेबारा टक्के योजने अंतर्गत भूखंड वाटप करणेबाबत.....

After discussions, the Board unanimously passed the following Resolution:

**RESOLUTION NO: 11637**

"असा ठराव पारित करण्यात येतो की संचालक मंडळ, 'नियोजित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प' शिघ्रगतीने पूर्ण करण्याकरिता, त्या क्षेत्रातील कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डशी संबंधित प्रकरणांत (विशेष बाब म्हणून) सर्व निर्णय व्यवस्थापकीय संचालक यांच्या स्तरावर घेण्यास या पूर्वीच्या प्रथा व प्रकरणे पाहून, मान्यता देत आहे."

# प्रवर्ग - १

## इतर हक्कात कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डचा उल्लेख असलेल्या भूखंडाची यादी

| अ.क्र. | गांव | निवाडा क्र. | भूधारकांचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | संचिका क्र. | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कोपर | 14(2) | अनंत शंकर नाईक | 2<br>2 | 2+5+6/2<br>2+5+6/4 | 0-2-2<br>0-16-5 | 188 | 6 | 111 | 22/1/2011 | 2/2/2011 |
| 2 | कोपर | 38 | चंदर धकु पाटील | 1<br>8<br>11<br>55<br>98<br>98<br>99 | १+२+४t०७/५<br>१t०४/२<br>२t०६/१<br>६<br>१५<br>१७<br>११ | 0-4-9<br>0-41-3<br>0-3-3<br>0-45-2<br>0-16-0<br>0-5-8<br>0-41-2 | 241 | 6 | 86 | 9/4/2012 | 29/05/2012 |
| 3 | कोपर | 8 | गजानन गणपत पाटील | 12<br>97 | १+३/२<br>९ | 0-6-5<br>0-27-5 | 274 | 6 | 34 | 4/4/2012 | 10/7/2012 |
| 4 | कोपर | 55 | गंगाराम काशीराम पवार | 24<br>44<br>56<br>97<br>101 | ५A<br>५<br>३<br>१२<br>२t०४+९+१०/ | 0-7-4<br>0-4-0<br>1-13-0<br>0-35-0<br>0-18-8 | 275 | 6 | 89 | 31/1/2012 | 5/3/2012 |
| 5 | कोपर | 186 | मधुकर नागू धुमाळ | 61<br>93<br>93<br>94<br>94<br>95 | ७<br>४<br>७<br>९<br>१४<br>१५ | 0-24-4<br>0-9-7<br>0-1-2<br>0-9-1<br>0-6-0<br>0-4-6 | 327 | 3 | 70 | 29/2/2012 | 7/3/2012 |
| 6 | कोपर | 21A<br>21B | राधा कमळ्या कोळी<br>राधा कमळ्या कोळी | 88<br>77<br>72<br>78<br>77 | १<br>२<br>२<br>७<br>६ | 0-37-3<br>0-9-0<br>0-30-5<br>0-6-0<br>0-3-0 | 374 | 4 | 165 | 22/2/2012 | 6/3/2012 |
| 7 | कोपर | 247 | शंकर हिरा कोळी | 60 | ६ | 0-10-0 | 401 | 6 | 116 | 25/1/2012 | 8/2/2012 |
| 8 | कोपर | 34 | वंदना जनार्दन पाटील<br>शानु जनार्दन पाटील<br>बाबुराव जनार्दन पाटील | 59 | 11 | 0-32-0 | 445 | 5 | 68 | 12/3/2012 | 9/4/2012 |
| 9 | कोपर | 32 | जयद्रथ अनंत पाटील<br>प्रविण अनंत पाटील<br>विठाबाई अनंत पाटील | 35<br>43 | 3<br>3B | 0-6-8<br>0-37-0 | 534 | 5 | 61 | 23/5/2012 | 5/6/2012 |
| 10 | कोपर | 5 | अंबाजी बाळकु कोळी | 82 | ९ | 0-24-3 | 667 | 3 | 16A | 31/1/2012 | 7/12/2012 |
| 11 | कोपर | 177 | बाबू काथारी केणी | 93<br>96 | 9<br>7 | 0-18-7<br>0-29-3 | 669 | 6 | 79 | 7/2/2012 | 13/3/2012 |
| 12 | कोपर | 22 | खंडू जग्या पवार | 56 | 16 | 0-10-0 | 342 | 6 | 120 | | |

# प्रवर्ग - १

## इतर हक्कात कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डचा उल्लेख असलेल्या भूखंडाची यादी

| अ.क्र. | गांव | निवाडा क्र. | भूधारकांचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | संचिका क्र. | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 13 | कोपर | 146 | बबन सुदाम पाटील | 54 | 11 | 0-5-8 | 457 | 2A | 99 | | |

7-03-3

Patil

# प्रवर्ग - २

## निवाडयात कुळ व कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डचा उल्लेख असलेल्या भूखंडाची यादी

| अ.क्र. | गांव | निवाडा क्र. | भूधारकांचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | संचिका क्र. | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कोपर | 137 | पांडुरंग मारुती गायकवाड<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 6 | 5 | 0-32-0 | 18 | 3 | 71 | 5/2/2010 | 22/3/2010 |
| 2 | कोपर | 148 | बुध्या बामा कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 88 | 10 | 0-20-9 | 204 | 5 | 26 | 9/1/2012 | 25/01/2012 |
| 3 | कोपर | 165(2) | बाबू नामा पाटील<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 99<br>54 | 26<br>4 | 0-3-8<br>0-31-6 | 211 | 3 | 6+7 | 1/4/2009 | 6/4/2009 |
| 4 | कोपर | 154 | बाळू अंबा कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 72<br>77 | 12<br>7 | 0-8-5<br>0-11-0 | 229 | 6 | 113 | 15/3/2012 | 27/3/2012 |
| 5 | कोपर | 63 | चंदर जोमा कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 84 | 5 | 00-41-2 | 244 | 4 | 56 | 7/6/2012 | 15/6/2012 |
| 6 | कोपर | 49 | गण्या नामा कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 84 | 15 | 0-22-2 | 308 | 3 | 95 | 29/12/2012 | 8/1/2013 |
| 7 | कोपर | 174 | गणपत वागना हिरा कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 85 | 5 | 0-49-1 | 310 | 5 | 43 | 23/2/2012 | 12/3/2012 |
| 8 | कोपर | 141(2) | पद्या शिमग्या कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 77<br>82 | 3<br>7 | 0-13-0<br>0-17-0 | 371 | 6 | 52 | 15/10/2010 | 25/10/2010 |
| 9 | कोपर | 263 | हात्या गोपाळ पाटील<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 99 | 21 | 0-15-4 | 468 | 5 | 121 | 10/1/2012 | 21/3/2012 |
| 10 | कोपर | 74 | जनार्दन विठ्ठल कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 84 | 6 | 0-36-5 | 489 | 4 | 69 | 13/01/2012 | 20/01/2012 |
| 11 | कोपर | 31B | कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड<br>चंदर चिरकुट पाटील | 14<br>53<br>93 | 1+3/3<br>18<br>10 | 0-16-2<br>0-9-5<br>0-36-0 | 542 | 3 | 32 | 1/3/2012 | 2/5/2012 |
| 12 | कोपर | 48 | कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड<br>उंदीर नामा पाटील | 97 | 15 | 0-13-0 | 595 | 6 | 125 | 25/4/2012 | 14/5/2012 |
| 13 | कोपर | 185 | मंगल्या गणपत कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 71<br>72 | 12<br>10 | 0-21-0<br>0-12-0 | 613 | 6 | 42 | 29/11/2012 | 7/12/2012 |
| 14 | कोपर | 209 | रघुनाथ गणपत कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 70<br>70<br>70<br>71<br>71 | 2<br>6<br>9<br>5<br>7 | 0-14-0<br>0-1-2<br>0-2-7<br>0-2-8<br>0-48-1 | 663 | 4 | 138 | 7/2/2012 | 14/2/2012 |
| 15 | कोपर | 208 | रामचंद्र बाळ्या कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 77<br>78 | 9<br>8 | 0-8-0<br>0-34-0 | 689A | 6 | 78 | 16/102012 | 31/1/2012 |
| 16 | कोपर | 38 | कान्या काळ्या कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 83 | 13 | 0-34-5 | 690 | 6 | 45 | 9/2/2012 | 22/2/2013 |
| 17 | कोपर | 39 | कमळ्या काना कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 70<br>82<br>84 | 1<br>1<br>3 | 0-12-7<br>0-23-8<br>0-25-0 | 692 | 6 | 61 | 22/1/2013 | 29/1/2013 |

# प्रवर्ग - २

## निवाडयात कुळ व कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डचा उल्लेख असलेल्या भूखंडाची यादी

| अ.क्र. | गांव | निवाडा क्र. | भूधारकांचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | संचिका क्र. | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 18 | कोपर | 6 | कलेक्टर कोर्ट ऑफ वाडे<br>अण्णा गोपाळ कोळी | 71 | 3 | 0-48-1 | 699 | 5 | 57 | 8/3/2013 | 8/4/2013 |
| 19 | कोपर | 153 | बामा रामा कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वाडे | 76 | 2 | 0-31-1 | 711 | 2A | 65 | 5/1/2012 | 16/01/2012 |
| 20 | कोपर | 95 | म-या राघो पाटील<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वाडे | 84 | 10 | 00-12-2 | 712 | 2a | 45 | 2/1/2012 | 16/1/2012 |
| 21 | उलवे | 62 | कोर्ट ऑफ़ वार्डस व कलेक्टर कुलाबा<br>चिमाजी चांगू मढवी<br>हरीश्चंद्र चांगू मढवी<br>शिमगूबाई चांगू मढवी | 102<br>116 | 1<br>4B | 00-03-5<br>00-10-7 | 9 | 5 | 75A | 26-10-2010 | Executed |
| 22 | उलवे | 140(2) | कोर्ट ऑफ़ वार्डस कलेक्टर कुलाबा<br>पांडूरंग बामा भोईर | 96 | 12 | 00-23-0 | 30 | 2 | 139 | 1/4/2009 | 13/8/2009 |
| 23 | उलवे | 196+260 | कोर्ट ऑफ़ वार्डस कलेक्टर कुलाबा<br>ताराबाई रामनाथ पाटील | 95 | १पै/६ | 00-20-0 | 92+1790 | 21 | 68 | 18-11-2009 | 19-11-2009 |
| 24 | उलवे | 128 | कलेक्टर कोर्ट ऑफ़ वार्डस कुलाबा<br>दत्तात्रय नारायण कोळी व 5 | 79 | 2 | 00-37-0 | 119 | 23E | 78 | 24-2-2012 | 21-3-2012 |
| 25 | उलवे | 188(2) | कोर्ट ऑफ़ वार्डस कुलाबा<br>म-या हि-या म्हात्रे | 53<br>53 | 6<br>4 | 00-06-3<br>00-14-8 | 147 | 20 | 171 | 3/6/2010 | 4/6/2010 |
| 26 | उलवे | 281(2) | कोर्ट ऑफ़ वार्डस कलेक्टर<br>दामोदर जानू पाटील | 92 | १३पै | 00-30-0 | 926 | 3 | 206 | 7/11/2007 | 21-11-2007 |
| 27 | उलवे | 242 | कोर्ट ऑफ़ वार्डस कलेक्टर कुलाबा<br>महादू उंदीर कोळी | 33 | 0 | 00-93-0 | 1067 | 20 | 90 | 3/3/2008 | 11/3/2008 |
| 28 | सोनखार | 23 | कोर्ट ऑफ़ वार्ड कलेक्टर कुळाबा<br>गुरुनाथ नाग्या ठोकल<br>रामजी नाग्या ठोकल<br>जान्या नाग्या ठोकल<br>गुंजी नाग्या ठोकल<br>बिरजी नाग्या ठोकल | 2<br>2<br>22<br>22<br>22<br>23 | 6<br>11<br>4<br>15<br>24<br>8 | 0-05-1<br>0-01-5<br>0-05-1<br>0-04-0<br>0-07-1<br>0-14-7 | 1416 | 3<br>2 | 208<br>43 | 26/5/2008<br>26/5/2008 | 3/10/2009<br>10/7/2009 |
| 29 | उलवे | 271 | शिवराम महादू पाटील<br>गंगाराम महादू पाटील<br>तुकाराम महादू पाटील<br>हरी महादू पाटील<br>तुळशीराम महादू पाटील<br>आत्माराम महादू पाटील<br>बयोबाई राघो घरत | 80<br>जुना | 1<br>2 | 00-81-2 | 945 | 21 | 39 | 27-08-2015 | |

# प्रवर्ग - २

## निवाडयात कुळ व कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डचा उल्लेख असलेल्या भूखंडाची यादी

| अ.क्र. | गांव | निवाडा क्र. | भूधारकांचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | संचिका क्र. | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | निराबाई बाळू पाटील<br>कमळाबाई त्रिंबक पाटील<br>कोर्ट ऑफ़ वार्ड कुलाबा | | | | | | | | |
| 30 | कोपर | 147 | कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड<br>बामा कुढ्या कोळी | 89 | 8 | 0-15-8 | 203 | 2 | 16 | | |
| | | 152 | कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड<br>बामा बुध्या कोळी | 77 | 8 | 0-28-0 | | 2a | 59 | | |
| 31 | कोपर | 229 | कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड<br>लक्ष्मण सिताराम पाटील | 91 | 4 | 0-19-2 | 214 | 6 | 104 | | |
| 32 | कोपर | 72b | चाहू नामा पाटील<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 55<br>99 | 7<br>10 | 0-46-0<br>0-28-4 | 490 | 6 | 66 | | |
| 33 | कोपर | 105 | धर्मा गणपत पाटील<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 89 | 4 | 0-24-9 | 525 | 6 | 135 | | |
| | | | महादा गना कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 89<br>90 | 7<br>4 | 0-8-9<br>0-22-6 | | 3 | 106 | | |
| 34 | कोपर | 126(2) | नारायण महाद्या कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 84<br>84<br>88 | 11<br>14<br>4 | 0-3-0<br>0-4-0<br>0-22-8 | 532 | 1 | 25a | | |
| 35 | कोपर | 143 | परषुराम चांगा कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 70<br>70 | 3<br>5 | 0-29-5<br>0-14-0 | 569 | 6 | 36 | | |
| 36 | कोपर | 100(1) | दिनकर भु-या कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 72<br>71<br>71 | 8<br>8<br>10 | 0-9-3<br>0-10-4<br>0-12-2 | 600 | 4 | 65 | | |
| 37 | कोपर | 142 | पद्या काना कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 82<br>82<br>91 | 11<br>13<br>2 | 0-10-5<br>0-19-9<br>0-43-4 | 611 | 6 | 63 | | |
| 38 | कोपर | 118 | नारायण बाळ कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 88 | 9 | 0-68-6 | 630+679 | 6 | 101 | | |
| 39 | कोपर | 150 | बाळू भाऊ कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 84<br>83 | 7<br>6 | 0-3-5<br>0-3-0 | 691 | 3 | 43 | | |
| | कोपर | 151 | बाळू भाऊ कोळी<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 82<br>83<br>83 | 14<br>4<br>7 | 0-1-1<br>0-51-8<br>0-26-1 | | | | | |
| 40 | कोपर | 120 | नामा चंदर पाटील<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 76 | 3 | 0-19-0 | 737 | 2 | 15 | | |
| 41 | कोपर | 5B | जनार्दन चंदर पाटील<br>इंदूबाई नारायण बिवाळकर | 99 | 8 | 0-18-7 | 291 | | | | |
| 42 | उलवे | 164(1) | कोर्ट ऑफ़ वार्डस कलेक्टर<br>कुलाबा<br>काशीनाथ तुकाराम म्हात्रे | 86 | १पै | 00-30-0 | 18 | 3 | 265 | | |

27|5

# प्रवर्ग - २

## निवाडयात कुळ व कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डचा उल्लेख असलेल्या भूखंडाची यादी

| अ.क्र. | गांव | निवाडा क्र. | भूधारकांचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | संचिका क्र. | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 43 | उलवे | 158(2) | कोर्ट ऑफ़ वार्डस कलेक्टर<br>बाबूराव कृष्णा पाटील | 95 | 7 | 00-10-0 | 92 | 23E | 39 | | |
| 44 | उलवे | 52A | कोर्ट ऑफ़ वार्डस व कलेक्टर<br>कुलाबा<br>चिंतामण गंगाराम पाटील | 80 | 3/1 | 00-12-6 | 93 | 20 | 62 | | |
| 45 | उलवे | 103 | कोर्ट ऑफ़ वार्डस कुलाबा<br>दत्तु मारुती कोळी<br>दत्तात्रय रामचंद्र पाटील<br>गंगाराम रावजी खारकर<br>काशीराम लाला कोळी<br>दत्तु मारुती कोळी | 94 | 1 | 00-57-0 | 140+1006 | 23 | 172 | | |
| 46 | उलवे | 281(3) | कोर्ट ऑफ़ वार्डस कलेक्टर<br>यशवंत पांडू पाटील | 92 | १३पै | 00-30-8 | 157 | 23E | 42 | | |
| 47 | उलवे | 164(5) | कोर्ट ऑफ़ वार्डस कलेक्टर<br>कुलाबा<br>गणपत शंकर घरत | 86 | १पै | 00-16-0 | 857 | 23 | 23 | | |
| 48 | उलवे | 151 | कलेक्टर कोर्ट ऑफ़ वार्डस<br>कुलाबा<br>बारक्या पद्या पाटील | 49<br>38 | 0<br>0 | 00-06-0<br>00-37-0 | 894 | 3 | 187 | | |
| 49 | उलवे | 164(3) | कोर्ट ऑफ़ वार्डस कलेक्टर<br>कुलाबा<br>पद्या आबा मढवी | 86 | १पै | 00-16-0 | | | | | |
| 50 | उलवे | 164(4) | कोर्ट ऑफ़ वार्डस कलेक्टर<br>कुलाबा<br>अंबू जाना घरत | 86 | १पै | 00-16-0 | | | | | |
| 51 | उलवे | 217 | कलेक्टर व कोर्ट ऑफ़ वार्डस<br>कुलाबा<br>नामदेव व बबन बुधाजी मढवी | 79 | 1 | 00-24-0 | | | | | |
| 52 | उलवे | 224 | विठ्ठल बाळू पाटील<br>कलेक्टर व कोर्ट ऑफ़ वार्डस<br>कुलाबा | 83 | १पै/११ | 00-21-0 | | | | | |
| 53 | उलवे | 261(3) | कोर्ट ऑफ़ वार्डस कलेक्टर<br>कुलाबा<br>हिराजी गणपत खारकर<br>गोपाळ गणपत खारकर | 116 | 6 | 00-09-0 | | | | | |
| 54 | उलवे | 281(1) | कोर्ट ऑफ़ वार्ड कलेक्टर कुलाबा<br>मोहन चांगू म्हात्रे | 92 | १३पै | 00-10-0 | | | | | |
| 55 | कोपर | 27 | कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड<br>धर्मा काळ्या कोळी | 67 | 1 | 0-13-0 | | | | | |

Patil

# प्रवर्ग - २

## निवाडयात कुळ व कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डचा उल्लेख असलेल्या भूखंडाची यादी

| अ.क्र. | गांव | निवाडा क्र. | भूधारकांचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | संचिका क्र. | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 56 | कोपर | 160(4) | बाळाराम बाळकू पाटील<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 48 | 2 | 0-6-0 | | | | | |
| 57 | कोपर | 56(3) | ग्रामपंचायत कोपर<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 23 | 0 | 0-39-0 | | | | | |
| 58 | कोपर | 173(2) | बाळू रामा पाटील<br>जोमाबाई आंब्या पाटील<br>कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 90 | 6 | 0-41-3 | | | | | |
| | | | | | | **20-24-4** | | | | | |

| अ.क्र | गांव | संपादित जमीन (हे.आर) | १२.५% अंतर्गत देय क्षेत्र (चौ.मी.) | यापैकी वाटप क्षेत्र (चौ.मी.) | इरादित क्षेत्र (चौ.मी.) | शिल्लक क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोपर | १३-७२-० | १२००५ | ६२०० | ४८०० | १००० |
| २ | उलवे | ६-१४-९ | ५३८० | २८०० | १७५० | ८५० |
| ३ | सोनखार | ०-३७-५ | ३२८ | ३५० | 0 | 0 |
| | | | | | | |
| एकूण | | २०-२४-४ | १७७१३ | ९३५० | ६५५० | १८५० |

Patil

# प्रवर्ग - ३

## कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डच्या १२ प्रकरणांची यादी

| अ.क्र. | गांव | निवाडा क्र. | भूधारकांचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | संचिका क्र. | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोपर | ५४क | चांगा हाल्या पाटील | ८४ | ४ | 0-51-5 | २४० | ३ | ५९ | 14/09/2011 | 5/11/2011 |
| २ | कोपर | १५७ | बुगाबाई जान्या झुगे | ५५ | ३ | 0-33-5 | ४७६ | ६ | A-११२ | 14/12/2011 | 27/12/2011 |
| | | | | ५४ | २ | 0-23-2 | | | | | |
| ३ | कोपर | १३अ | गोपाळ भाग्या पाटील | ९० | ११ | 0-9-4 | ४८१ | ६ | ५० | 26/05/2010 | 4/6/2010 |
| ४ | कोपर | २९B | इंदीराबाई नारायण बिवाळकर<br>दत्तु कोल्ह्या म्हात्रे | ४४ | २ | 0-30-3 | ४८८ | ३ | १०० | 18/4/2012 | 10/5/2012 |
| | कोपर | २९ | दत्तु कोल्ह्या म्हात्रे | ४० | १B | 0-10-0 | | ६ | ९१ | 10/2/2010 | 13/04/2010 |
| | | | | ५६ | 4 | 0-4-0 | | | | | |
| | | | | ४२ | 0 | 0-6-8 | | | | | |
| ५ | कोपर | १३९ | जिल्हाधिकारी, रायगड | ९२ | ४ | 0-47-5 | ५६७ | ६ | १०५ | 20/11/2012 | 28/11/2012 |
| ६ | कोपर | ९ब | आत्माराम काशिनाथ पवार (मयत) | ५६ | २ | 0-13-1 | ४६५ | ३ | २२ | 28/03/2008 | |
| | | | | ९६ | १२ | 0-10-8 | | | | | |
| ७ | कोपर | २६७ब | जिल्हाधिकारी कोर्ट ऑफ वॉर्ड | ८४ | १७ | 1-87-5 | ५६६ | २ | १६ | 8/4/2011 | |
| ८ | कोपर | २२१ब | राजाराम गोमा म्हात्रे | ९६ | ६ | 0-14-3 | ५७७ | ४ | ३३ | 13/02/2011 | |
| ९ | कोपर | २६७क | ऐकनाथ नागू धुमाळ कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्ड | ७० | ८ | 2-53-0 | ८९ | ६ | ८३+८४ | | |
| | कोपर | ४७ | ऐकनाथ नागू धुमाळ<br>इंदिराबाई नारायण बिवलकर कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्ड | ७६ | १ | 2-54-2 | | | | | |
| १० | कोपर | ५४ | श्री. बना नामा पाटील | ९१ | ९ | 0-18-2 | २०५ | ५ | १०४ | | |
| | कोपर | १५६ | श्री. बना नामा पाटील कलेकटर कोर्ट ऑफ वॉर्ड | ५६ | ६ | 0-12-9 | | ३ | १३ | | |
| | कोपर | १५६A | श्री. नामा कुश्या पाटील | ९७ | १७ | 0-18-4 | | | | | |
| ११ | कोपर | २१६ | श्री. शांताराम नामाजी म्हात्रे | ९० | १० | 0-24-7 | ५५१ | ६ | ३२ | | |
| १२ | कोपर | २०५ | श्री. यादव भाग्या पाटील व इतर | १५ | ४+५+७/४ | 0-15-5 | १९२ | | | | |

**10-38-8**

| अ.क्र | गांव | संपादित जमीन (हे.आर) | १२.५% अंतर्गत देय क्षेत्र (चौ.मी.) | यापैकी वाटप क्षेत्र (चौ.मी.) | इरादित क्षेत्र (चौ.मी.) | शिल्लक क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोपर | १०-३८-८ | ९१०० | ३८५० | ५१०० | १५० |
| | | | | | | |
| **एकूण** | | **१०-३८-८** | **९१००** | **३८५०** | **५१००** | **१५०** |

Patil

# प्रवर्ग - ४

## निवाडयात कलेक्टर कोर्ट ऑफ वॉर्डचा उल्लेख असलेल्या भूखंडाची यादी

| अ.क्र. | गांव | निवाडा क्र. | भूधारकांचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | संचिका क्र. | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | उलवे | २६१ | मे. कलेक्टर कोर्ट ऑफ़ वार्डस कुलाबा | 10<br>31<br>98<br>104 | 13<br>0<br>0<br>1 | 00-18-0<br>00-03-0<br>01-71-0<br>00-07-3 | 1790 | | | | |
| 2 | उलवे | २६१अ | मे. कलेक्टर कोर्ट ऑफ़ वार्डस कुलाबा | 35<br>97 | ०पै<br>2 | 05-40-0<br>03-69-3 | 1790 | | | | |
| 3 | उलवे | २६१(४) | कोर्ट ऑफ़ वार्डस कलेक्टर कुलाबा | 80 | ७पै | 00-20-0 | 1790 | | | | |
| 4 | कोपर | 267A | कलेक्टर कोर्ट ऑफ वार्ड | 69 | 0 | 2-88-0 | 1790 | | | | |
| 5 | दापोली | 261 | कोर्ट ऑफ वॉर्डर्स व कलेक्टर रायगड<br>कोर्ट ऑफ वॉर्डर्स व कलेक्टर रायगड<br>कोर्ट ऑफ वॉर्डर्स व कलेक्टर रायगड | 101<br>103<br>125<br>69<br>74<br>105<br>138<br>146<br>165<br>166<br>167<br>12<br>92<br>97<br>99<br>100<br>102<br>114<br>70<br>71<br>123<br>109a<br>124 | 1<br>0<br>1<br>2<br>13<br>1<br>1<br>4<br>2<br>8<br>2<br>8<br>4<br>0<br>9<br>1<br>5<br>3<br>1<br>1<br>5<br>1<br>1 | 0-81-0<br>2-00-0<br>0-93-0<br>0-71-9<br>0-45-0<br>0-96-0<br>0-35-0<br>0-2-5<br>0-33-2<br>0-1-3<br>0-2-3<br>0-1-5<br>0-65-0<br>0-16-0<br>0-20-0<br>0-14-0<br>0-25-0<br>0-12-1<br>0-15-7<br>0-21-0<br>0-10-0<br>0-40-0<br>3-79-5 | 1790 | | | | |
| 6 | तरघर | 2/1 | कोर्ट ऑफ वार्ड व कलेक्टर ऑफ कुलाबा | 26<br>35<br>39<br>51 | 0<br>0<br>0<br>0 | 2-78-0<br>8-96-9<br>2-93-0<br>4-14-0 | 1790 | | | | |
| 7 | तरघर | 1/2 | कोर्ट ऑफ वार्ड व कलेक्टर ऑफ कुलाबा | 70 | 0 | 5-38-0 | 1790 | | | | |
| 8 | तरघर | 1/3 | कोर्ट ऑफ वार्ड व कलेक्टर ऑफ कुलाबा | पडी नं ३ | 0 | 0-08-0 | 1790 | | | | |
| 9 | सोनखार | १ब | कोर्ट ऑफ़ वार्ड कलेक्टर रायगड | 3<br>5<br>6<br>7<br>15<br>16<br>20<br>22<br>23<br>1 | 14<br>25<br>0<br>7<br>1<br>25<br>40<br>27<br>23<br>3 | 0-09-1<br>0-00-5<br>0-47-0<br>0-03-0<br>0-22-0<br>0-02-0<br>0-02-6<br>0-01-8<br>0-09-6<br>0-72-9 | 1790 | | | | |
| | | | | | | **52-96-00** | | | | | |